सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/२०२३/ 1014
दिनांक :- 05 APR 2023

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- युनिसेफ अंतर्गत Learning Link Foundation व्दारे आयोजित करण्यांत येणा-या प्रशिक्षणाचा लाभ घेणेबाबत.**

**संदर्भ :-** मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक १७/तंशिसं/युनिसेफ/प्रशिक्षण/२०२३/७८ दिनांक १७/०३/२०२३.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी Learning Link Foundation या संस्थेव्दारे युनिसेफ च्या मदतीने Financial Literacy व Digital Productivity या दोन विषयावरील प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याबाबत संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयास कळविलेले आहे. सोबत पत्राची प्रत सलग्न करण्यात येत आहे. सदरचे प्रशिक्षण साधारणत्ा: प्रत्येकी ५ तासाचे असून ते ऑनलाईन रित्या मार्च आणि एप्रिल या दोन महिन्याच्या कालावधीमध्ये राबविण्यात येणार आहे.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील पदविका व पदवी अभ्यासक्रमात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना व संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर यांना सुध्दा या उपक्रमांतर्गत आयोजित मोफत प्रशिक्षणाचा लाभ घेण्यास प्रोत्साहन देण्याबाबतच्या सूचना आपल्यास्तरावरुन देण्यात याव्या.

तसेच Learning Link Foundation ही संस्था आपणाकडे संपर्क साधणार असून सदर संस्थेला आवश्यक ते सहकार्य करावे.

**सहपत्र :-** संदर्भीय पत्र.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्राशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना ई-मेल करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१९
ई-मेल-desk17@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक : १७/तंशिसं/युनिसेफ/प्रशिक्षण/२०२३/७८ दिनांक : 17 MAR 2023

प्रति,
**सहसंचालक,**
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

**विषय : युनिसेफ अंतर्गत Learning Link Foundation व्दारे आयोजित करण्यांत येणाऱ्या प्रशिक्षणाचा लाभ घेणेबाबत...**

**संदर्भ : Learning Link Foundation यांचे दिनांक २८ फेब्रु., २०२३ रोजीचे पत्र**

पदवी तसेच पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम व व्दितीय वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी Learning Link Foundation या संस्थेव्दारे युनिसेफ च्या मदतीने Financial Literacy व Digital Productivity या या २ विषयावरील प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदरचे प्रशिक्षण साधारणत: प्रत्येकी ५ तासांचे असून ते ऑनलाईन रित्या मार्च आणि एप्रिल या २ महिन्याच्या कालावधी राबविण्यात येणार आहे.

या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व पदवी तसेच पदविका संस्थांना याबाबत अवगत करुन संबंधित संस्थेत प्रथम व व्दितीय वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना या उपक्रमांतर्गत आयोजित मोफत प्रशिक्षणाचा लाभ घेण्यास प्रोत्साहन देण्याबाबतच्या सूचना द्याव्यात.

सदर कोर्सेबाबतच्या अधिक माहितीसाठी https://schools.myp2e.org या संकेतस्थळास भेट देण्याच्याही सूचना द्याव्यात.

श्री अंधारे, नुसार 14 April नंतर plan करावे
27/3/23

(डॉ. विनोद मोहितकर)
प्र.संचालक, तंत्र शिक्षण,
म.रा., मुंबई

प्रत माहितीसाठी व उचित कार्यवाहीस्तव : डॉ.विठ्ठल बांदल,राज्य नोडल अधिकारी (तंत्रशिक्षण) तथा प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,पुणे

C:\Users\TEQIP\Downloads\TEQIP Letter (29).doc